# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे 'विशेष' विद्यार्थ्यांना मदत

पुणे : फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) आणि रिचमंड युनिव्हर्सिटी (लंडन) यांनी विशेष मुलांसाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे. या अंतर्गत सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त विद्यार्थ्यांना ते ३१४ व्हिलचेअर, ३१४ कमोड चेअर्स आणि १०० विशेष सुधारित खुर्च्यांचे वाटप फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे सॅबिस्टियन मोनी व मुकुल माधव फाउंडेशनचे अतुल माने यांच्या हस्ते करण्यात आले.

यासंदर्भात फाउंडेशनच्या विश्वस्त रितु छाब्रिया यांनी सांगितले, सातारा जिल्हा परिषदेने एका सर्वेक्षणात जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त ३१४ विद्यार्थ्यांची निवड केली होती. एमएमएफ आणि रिचमंड युनिव्हर्सिटी यांनी संयुक्तपणे या मुलांना प्रत्येकी एक व्हिलचेअर आणि एक कमोड चेअर देऊन आणखी मदत करण्याचा निर्णय घेतला.

सेरेब्रल पाल्सी, बहुविध विकलांगता, अस्थिव्यंग इ. समस्या असलेल्या विद्यार्थ्यांना शारिरीक व्यंगामुळे शाळेपासून दूर राहावे लागते. त्यांना बसण्याच्या, उठण्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो. अशा विशेष मुलांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी, सातारा जिल्हा परिषदेने फाउंडेशनला मदत करण्याची विनंती केली होती. रितु छाब्रिया यांना लिहिलेल्या पत्रात सातारा जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील यांनी मदतीसाठीचे तपशील देऊन आणि ङ्गसुधारित सी. पी.फ खुर्च्यांसाठी निधी पुरविण्याची विनंती केली होती. सातारा जि. प.चे रोहित बर्गे आणि ज्ञानेश्वर शेलार यांच्या मते, या प्रकल्पामुळे या विशेष मुलांना अत्यंत मदत होईल आणि त्यातून सर्वांसाठी शिक्षण हे लक्ष्य पूर्ण करण्याची अपेक्षा आहे.